

## संगीतातील कुमारयुग

**पं. कुमार गंधर्व यांची आज ८४ वी जयंती. त्यानिमित्त-**

मीवयाच्या आठव्या वर्षापासून मोकळ्या मनाने मैफलीचा आस्वाद घेत आलो आहे. अनेक गायक, गायिका, वादक यांच्या असंख्य मैफली रात्र-रात्र ऐकल्या, त्यात आपल्या स्वतंत्र विचारांनी नवीन गायकी निर्माण करणाऱ्या पंडित कुमार गंधर्व यांनी गायलेल्या मालवती रागाची रूपरेखा माझ्या मनात कायमची ठसलेली आहे. मी मैफलीला गेल्यावर संपूर्ण मैफल झाली की त्याचे वर्णन लिहीत असे. तसेच त्यांच्या गायकीचा माझ्या मनावर उमटलेला ठसा मी लिहून ठेवीत असे. पंडित ओंकारनाथ, उस्ताद बडे गुलाम अली, अमीरखां, सुरश्री केसरबाई केरकर, पंडित मलिकार्जुन मन्सूर, माणिक वर्मा, पंडित राम मराठे, पंडित सुरेश हळदणकर, पंडित भीमसेन जोशी तसेच वाद्यवादनांत पंडित रविशंकर, उस्ताद विलायतखां अशा अनेक दिग्गज कलावंतांची माहिती लिहिलेली माझी वही राहण्याची जागा बदलण्याच्या गडबडीत हरवली गेली. तब्बल ५४ वर्षांनी ती परत मिळाली तेव्हा किती आनंद झाला असेल याची कल्पना करा. तेव्हा त्यांतील एकेका मैफलीचे स्मृतिचित्र लोकांपर्यंत पोहोचवावे म्हणून पहिलीच मैफल कुमार गंधर्वांच्या नवीन रागापासून सुरुवात करतो.

मी उस्ताद बडे गुलाम व मा. कृष्णराव यांच्या गाण्यांची तारीफ केली की ऐकणारे नेहमी सांगत की हे कलाकार मोठे आहेतच, पण तू कुमारांना ऐक. सांगणारे संगीतातले जाणकार, त्यात पुण्याचे अप्पासाहेब इनामदार गायक तसेच रसिक. पंडित वसंतराव राजोपाध्ये गायक व शास्त्रकार, पंडित शंकरराव मोहिते हे मास्तर दीनानाथांचे चाहते व भक्त, तसेच गणपतराव मोहिते (मा. अविनाश या नावे प्रसिद्ध) यांचे मोठे बंधू यांना निरनिराळ्या बंदिशी जमविण्याचा नाद होता. मी जेव्हा त्यांच्या घरी जात असे तेव्हा ते मला मा. दीनानाथ व मुंडले बुवांच्या बंदिशी ऐकवीत असत. असाच एकदा त्यांच्याक डे गेलो असताना ते मला म्हणाले की, अरे, पुण्याला कुमारांनी मालवती ऐकविला आणि त्यांनी मालवती रागाचे असे काही वर्णन सुरू केले की डोळ्यासमोर मालवतीचे चित्रच उभे केले व म्हणाले, काय तो सुरेलपणा, काय ती चीज म्हणायची पद्धत, रागाची पद्धतशीर मांडणी. मी म्हणालो, कसा आहे तो राग? तसे ते म्हणाले की, मा. दीनानाथ 'चंद्रिका ही जणू' ज्या दुर्गा रागात गात, त्याचसारखे त्यांचे स्वर व मालवतीचे स्वर एकच. पण चलन एकदम वेगळे होते. मी बऱ्याच वेळा शंकररावांकडे गेलो होतो, पण कुमारांच्या गाण्याने एवढे अस्वस्थ झाल्याचे कधीच पाहिले नव्हते व त्यामुळे मलाही त्या मालवतीबद्दल कमालीची उत्सुकता लागून राहिली. अखेर कुमारांचे गाणे ऐकण्याचा योग थोड्याच दिवसांत आला. १९५४ साली पंडित सुरेश हळदणकर यांनी कुमारांचा पहिला कार्यक्रम मुंबईत हरी महादेव वैद्य हॉल, शिवाजी पार्क येथे घडवून आणला. त्या वेळी प्रवेश फी रु. १५ होती. त्या वेळी रु. १५ म्हणजे खूपच वाटायचे. कुमारांच्या गाण्याची जितकी ओ ढ होती त्याहून जास्त पैशाची ओढ होती. मी एका गृहस्थाला कुमारांच्या कार्यक्रमाच्या दोन प्रवेशपत्रिका घ्यायला सांगितले व दर महिन्याला पाच प्रमाणे तीन महिन्यांनी संपूर्ण रक्कम देईन, असे सांगितले. त्याची परिस्थितीही बेताचीच होती. त्या दिवशी सकाळपासूनच पाच कधी वाजताहेत असे झाले होते. चार वाजताच हॉल प्रेक्षकांनी भरून गेला होता. श्रोत्यांमध्ये अनेक गायक-गायिका तसेच पार्श्वगायनातील कलावंत, साहित्यिक, कवी अशी अनेक मंडळी उपस्थित होती. सर्वांनाच कुमार गंधर्वांच्या नव्या गायकीची उत्सुकता लागली होती.

कार्यक्रमाचे स्वरूप असे होते- गायन- भानुमती कोमकली व पंडित कुमार गंधर्व, हार्मोनियम- पंडित गोविंदराव पटवर्धन, तबला- वसंत आचरेकर व वसंतराव देशपांडे, निवेदक- पु. ल. देशपांडे, प्रमुख पाहुणे- आचार्य अत्रे, पु. लं.नी निवेदनात भानुताईंचे गाणे व कुमारांच्या आजारपणातल्या सेवेबद्दल सांगितले. तद्नंतर भानुताईंनी श्री राग सुरू केला. सुरेल व टोकदार स्वर ग्वाल्हेर घराण्या पद्धतीने त्यांनी उत्कृष्ट पद्धतीने मांडला व पद्धतशीरपणे गायल्या. त्यानंतर रंगमंचावर आले कुमारजी. मी त्यांना प्रथमच पाहत होतो. तेजस्वी डोळे व मैफलीवर पकड ठेवणारे व्यक्तीत्व लक्षात येत होते. हॉलमध्ये कमालीची शांतता होती. फक्त कुमार लावत होते त्या तानपुऱ्यांचा आवाज. तानपुरे लावल्यावर सर्वांच्या लक्षात एक गोष्ट आली की, असे तानपुरे आपण पूर्वी कधी ऐकले नव्हते. तानपुऱ्यांतून गन्धार, निषाद स्पष्ट ऐकू येत होते. तानपुरे वाजत नव्हते तर त्या आसमंतात स्वराने घुमत होते. श्रोत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली.

पु.लं.नी निवेदनास सुरुवात केली. कुमारांचे मोठेपण, त्यांची प्रतिभा तसेच त्यांची सात वर्षे आजारपणामुळे बंद पडलेली

संगीतसाधना व त्यातून चिंतनाने निर्माण झालेली नवी गायकी या विषयावर पु. ल. भावपूर्ण बोलले आणि कुमारांना मालवती रागाने आरंभ करण्यास सांगितल्यावर मला फारच आनंद झाला. कुमारांनी षडज् लावताच सर्वांच्या तोंडून वाहवा मिळवली इतका तो 'सा' सुरेल होता. त्यानंतर त्या रागातले आलाप सुरू केले. हे आलाप ऐकताना एकदम नवीन वाटत होतं, वेगळाच आनंद मिळत होता. त्यानंतर ख्याल सुरू झाला. या ख्यालाची सम अशी काही वजनदार येत होती की, सर्वांना त्यातील वजन व ताल जाणवत होता. प्रत्येक आलापात कितीतरी सुंदर जागा येत होत्या. त्याचप्रमाणे बोल आलापात तोच तोच शब्द वेगवेगळ्या स्वरांत म्हणण्याची त्यांची स्वत:ची शैली जाणवत होती.

त्यानंतरची कमाल म्हणजे 'सावरी हो धन मारी' ही ओळ वरच्या गंधारपासून अशी काही वेगात खाली आणली की अंगावरून विजेचा लोळ गेल्याचा भास झाला. त्यानंतरच्या ताना, त्याचा वेग हे सर्व थक्क करणारे होते. त्यानंतर त्यांची मध्यलयीतली 'मंगल दीन आयो…' ही चीज सुरू झाली. त्या चिजेने सर्वांना डोलवत ठेवून कुठूनही मंगल म्हणून व मात्रेत समेवर येण्याची किमया फारच अद्वितीय होती. मंत्रमुग्ध होणे म्हणजे काय किंवा माणसाला सर्व विसरायला लावणे याचाच तो अविस्मरणीय अनुभव.

मालवती राग ऐकल्यावर एक जाणीव झाली, ती म्हणजे चिंतनातून निर्माण झालेली गायकी. या गायकीचे स्वर आर्यांचे स्वर वाटत होते. याला मुसलमानी गायकीचा अजिबात स्पर्श नव्हता. कारण कुमारांच्या समकालीन बहुतेक गायक व गायिकांवर मुसलमानी गायकीचा परिणाम झाला होता. परंतु ऋषीमुनींना जसे आत्मज्ञान झालेले असते तसे कुमारांनाही चिंतनातून आलेली गायकी प्राप्त झालेली होती. या गायकीचे स्वरूप परंपरेच्या गायकीचा क्रम बाजूला ठेवून दागिने घालून आलेली होती. कुमारांचा आजार ही गायकी निर्माण करायला वरदान ठरली.

**पं. शंकर अभ्यंकर**

**(पूर्वप्रसिध्दी : लोकसत्ता, ८ एप्रिल २००७)**